**<u>सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात</u>**

**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २३/२०२२ मधील नि. २५ खालील आदेश</u>**

(हफीजा शेख विरुध्द शफुद्दीन मुजावर व इतर)

CNR NO. MHSO-2000-0079-2022

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १० यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना दि. ३०/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १० वकील उस्मान मुजावर हे मयत झाले आहेत. कोरोना कालावधीमुळे प्रतिवादी क्र. १० चे वारस मुदतीत अभिलेखावर आणता अले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १० चे वारस अभिलेखावर घेण्यास वादीस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब वादीने जाणून बुजून केलेला नाही. करीता वादीने सदरील अर्जाद्वारे विलंब माफ व्हावा व अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. १३ विरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

४. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ६ ते ८ तर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, वादीने अर्जामध्ये किती दिवसाचा विलंब झाला ते नमुद केले नाही. वादीने जाणूनबुजून विलंब केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

५. सदरच्या अर्जावर दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी मयत प्रतिवादी क्र. १० यांचे वारसांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीं पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. सदर अर्ज मंजूर

केल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच होईल. वादीने केलेला विलंब लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी विलंबाचा खर्च त्याच्यावर ठेवणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज (नि. २५) वादी यांनी खर्च रु. २,०००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

वादी यांनी सदर खर्चाचे रकमेपैकी रु. १,०००/- प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांना एकत्रात अदा करावेत तर उर्वरित रु. १,०००/- शासन नावे न्यायालयात जमा करावेत.

२. मयत प्रतिवादी क्र. १० यांचे मृत्यूबाबत तजवीज करणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.04.05 17:45:44 +0530

सांगोला. (सौ. बी. एम. पोतदार)

दिनांक: २९/०३/२०२५. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar, Civil Judge, J. D.& J. M. F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 29.03.2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 05.04.2025 |